MHJN060000292016

## निशाणी क्रमांक ७० वर आदेश पारीत

१) प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी भारतीय साक्षीपुरावा अधिनियम १९७२ चे कलम ६५ अन्व्ये दुय्यम पुरावा देणेसाठी दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुत अर्जाद्वारे वादी यांचे असे कथन आहे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा वाटपासाठी दाखल केलेला असून वादीची प्रस्तुत दाव्याकामी साक्ष नोंदविल्यानंतर दावा मिळकती संदर्भात खरेदीपत्र क्र.५३/१९८६ दिनांक ०७/०१/१९८६ रोजीचे मूळ खरेदीपत्र हे प्रतिवादी यांचे ताब्यात असल्यामुळे त्यांना नोटीस देऊन मूळ खरेदीपत्राची प्रत न्यायालयात दाखल करण्याची विनंती केलेली होती. परंतू सदरची प्रत अभिलेखावर दाखल करु शकत नाही, असे त्यांनी कथन केलेले आहे. सबब, सदर खरेदीपत्राबाबत दुय्यम पुरावा देण्याची परवानगी वादीतर्फे मागितलेली आहे.

३) प्रस्तुत अर्जास प्रतिवादी तर्फे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविलेला आहे. प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे प्रस्तूत प्रकरणातील प्रतिवादी क्र. १ चे पती हेह एकमेव मालक असल्याचे खरेदीपत्र क्र. ५३/१९८६ अन्वये दिसत आहे. त्यामुळे

वादी यांना प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा असल्याने सदर खरेदीपत्राबाबत कोणताही दुय्यम पुरावा देणेचा अधिकार नाही. त्यामुळे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नांमजूर करण्यात यावा.

४) प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील प्रतिवादी यांचे म्हणणे तसेच संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ तसेच प्रतिवादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ यांचा सखोल युक्तीवाद ऐकला.

५) अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द वाटपासाठी तसेच निरंतर मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादी यांच्या कथनानुसार, दावा मिळकतीबाबत प्रतिवादी क्र. १ चे पती उत्तम शंकर मिसाळ यांना प्रभाकर देशपांडे यांनी दिनांक ०७/०१/१९८६ रोजी नोंदणीकृत खरेदीपत्र क्र. ५३/१९८६ करुन दिलेले आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता, सदर खरेदीपत्राची सही–शिक्याची प्रत वादीतर्फे नि.क्र. ४९/२ लगत दाखल केलेली आहे. सदर खरेदीपत्राचे खरेदीदार प्रतिवादी क्र. १ चे पती आहेत, हे स्पष्ट होते. ते सद्या मयत आहेत. अशा परिस्थीतीत सदर खरेदीपत्राची मूळ प्रतिवादी क्र. १ कडे असणार हे स्पष्ट होते. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांना सदर खरेदीपत्राची मूळ प्रत अभिलेखावर दाखल करणेसंबंधी भारतीय साक्षी–पुरावा अधिनियम, १८७२ चे कलम ६६ अन्वये नोटीस पाठविली होती, हे स्पष्ट होते.

सदरची नोटीस मिळवून देखील प्रतिवादी क्र. १ यांनी सदर मूळ प्रत अभिलेखावर दाखल केलेली नाही. प्रतिवादी यांचे कथनांप्रमाणे सदरचे मूळ खरेदीपत्र त्यांना सापडत नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता, सदरचे खरेदीपत्र हे प्रस्तुत दावा मिळकती संदर्भात असून दाव्याचा अंतिम निर्णय होणेच्या दृष्टीने अभिलेखावर येणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. १ यांना सदरचे मूळ खरेदीपत्र सापडत नाही. सदर खरेदीपत्राची सही–शिक्याची प्रत अभिलेखावर दाखल आहे. त्यामुळे उपरोक्त कारणांचा विचार करता, भारतीय साक्षी–पुरावा अधिनियम, १८७२ चे कलम ६५ (अ) (क) अन्वये वादी यांना प्रस्तूत खरेदीपत्राची साक्षांकीत प्रत दुय्यम पुरावा म्हणून वाचनेस परवानगी देणे योग्य होईल. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचीत होईल. ***सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.***

## // आ दे श //

१) वादी यांचा प्रस्तुतचा निशाणी क्रमांक ७० चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांना दिनांक ०७/०१/१९८६ रोजीचे नोंदणीकृत खरेदीपत्र क्रमांक ५३/१९८६ बाबत दुय्यम पुरावा देण्याची परवानगी देण्यात येते.

Digitally signed by CHAITANYA SUNILDATTA DESHPANDE
Date: 2023.03.06 17:35:12 +0530

ठिकाण : भोकरदन.
दिनांक : ०६/०३/२०२३.

(सी. एस. देशपांडे)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
भोकरदन.